ISSN 2278-8808 SJIF 2014 = 4.889
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# भविष्यातील शिक्षक प्रशिक्षणात दुरस्थ शिक्षणाचे योगदान

**राऊत करूणादेवी भास्करराव**
*सहाय्यक प्राध्यापक धारेश्वर शिक्षणशास्त्र महाविद्यालय धायरी*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## प्रस्तावना :

विज्ञान युगात मानवाने विविध शोध लावले आहेत. त्यामुळे त्याच्या ज्ञानात अधिकाधिक भर ही पडत गेली आहे. थोडक्यात ज्ञानाचा स्फोट झाला आहे. किती ज्ञान आवश्यक केले तरी आपण अजून शिकलो पाहिजे. आपण आपली शैक्षणिक पात्रता वाढवली पाहिजे असे प्रत्येक मानवास वाटत असते आणि यातून दुरस्थ शिक्षण ही संकल्पना पुढे आली यातून ज्यांना औपचारिक पध्दतीने शिक्षण घेण्याची सोय नव्हती. त्यांच्यासाठीही पध्दत सुरू करण्यात आली. त्याचप्रमाणे भविष्यातील पिढी घडविणारे शिक्षण यांचाही विचार करण्यात आला. त्यामुळे १९७० मध्ये डॉ. व्ही.के. आर. व्ही.राव यांच्या मार्गदर्श नाखाली चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. त्यातून मुक्त विद्यापीठ ही संकल्पना अस्तित्वात आली. पर्या याने दुरस्थ शिक्षण हा मार्ग उपलब्ध झाला. सुरूवातीला अप्रशिक्षीत शिक्षकांसाठी पत्राव्दारे शिक्षण प्रशिक्षण ठेवण्यात आले. याची सुरूवात प्रथम मुंबई पंजाब म्हैसूर इ. ठिकाणी करण्यात आली. पहिले २५00 विद्यार्थ्यांपैकी काही बी.एड बी.ए बी.कॉम या वर्गात प्रवेश घेऊन आपली शैक्षणिक पात्रता वाढविली.

## व्याख्या :

दुरस्थ शिक्षणासंबंधी काही शैक्षणिक विचारवंतांनी आपली मते मांडली आहेत.

१. एम.मूर १९७७ "दुरस्थ शिक्षण म्हणजे अनुदेशनाच्या अनेक पध्दतींचा समुच्चय होय. अध्यापन व अध्ययन स्वतंत्रपणे घडतात कधी कधी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीतही अध्यापन केले जाते. बहुतांशवेळा संप्रेषण शिक्षक व विद्यार्थी यांच्या दरम्यानचे हे छापील लेखी साहित्य इलेक्ट्रॉनिक किंवा यांत्रिक साधनांव्दारे होते."

२. होम वर्ग "दूर शिक्षणाला संपर्कविरहीत स्वरूपाचे माध्यम म्हणतो अशाप्रकारच्या अध्यापन पध्दतीमध्ये पूर्वनिर्मित अभ्यासक्रम साहित्याचा सहभाग असतो.याठिकाणी अभ्यासक्रम साहित्याचा अर्थ मुद्रित साहित्याचा अध्ययन कृतीमध्ये वापर होतो आणि या साहित्याला अध्यापन साहित्याऐवजी अध्ययन साहित्य असे म्हणतात."

वरील व्याख्यांचा विचार केल्यास आपल्या असे लक्षात येते की सध्याच्या काळात विद्यार्थ्यांचा कल हा दूरस्थ शिक्षणाकडे अधिक वाढत चाललेला आहे. दूरस्थ शिक्षणाची विविध माध्यमे आहेत. ज्याव्दारे आपण आपली शैक्षणिक पात्रता वाढवू शकतो.

- पत्रव्यवहाराव्दारे शिक्षण
- आकाशवाणी व दूरदर्शनव्दारे शिक्षण
- मुक्त विद्यालय व मुक्त विद्यापीठ
  अ. इंदिरागांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ
  ब. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
- इंटरनेट

या माध्यमाव्दारे शिक्षक आपले प्रशिक्षण पूर्ण करू शकतात. इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ या विद्यापीठातून शिक्षक प्रशिक्षण देण्यात येते. त्यामुळे विद्यार्थ्यांना आपले ज्ञान वाढण्यास उपयोग होतो. इंटरनेटच्या माध्यमातून देखील नवनवीन गोष्टी या व्यक्तिंना माहित होत असतात.

दूरस्थ शिक्षणाची वैशिष्टये ः

१. दूरशिक्षणाचा पाया फक्त शिक्षक आणि विद्यार्थी हे एकमेकांपासून शारिरीकदृष्टया पूर्णतः अलग राहून त्यातून होणारे दळणवळण यावर आधारलेले आहे.
२. दूरशिक्षण हा कोर्स पूर्व तयारीनिशी केला असून यात छापील साहित्य तसेच विविध माध्यमे व साधने यांचा उपयोग केला जातो.
३. दूरशिक्षणाचा अभ्यासकमात आणि विषयज्ञान व अध्ययन साहित्य यामध्ये लवचिकता असते.
४. नेहमीच्या वर्गपध्दतीत एका विद्यार्थ्यावर जेवढा खर्च केला जातो. त्यापेक्षा कितीतरी कमी खर्च दूरशिक्षणाच्या विद्यार्थ्यांवर येतो.

## शिक्षक प्रशिक्षणात दुरस्थ माध्यमांची भूमिका ः

शिक्षण प्रशिक्षणात दुरस्थ शिक्षणाची महत्त्वाची भूमिका आहे. डी.टी.एड झाल्यावर आपली शैक्षणिक पात्रता वाढवावी असे अनेक शिक्षकांना वाटत असते. परंतु वेळेचा अभाव असल्याने आपली इच्छा त्यांना पूर्ण करता येत नाही. परंतु दुरस्थ शिक्षणामुळे त्याची सोय उपलब्ध झाली आहे. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ व इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ या माध्यमांव्दारे ते आपली शैक्षणिक पात्रता वाढवू शकतात. त्याच सोबत सुटटयांमध्ये याचे प्रशिक्षण वर्ग असल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होत नाही.

१. विद्यार्थी शिक्षकाला या कालावधी मार्गदर्शन करण्यात येते. नवीन ज्ञानाची माहिती त्यांना मिळते. शिक्षण क्षेत्रात आलेल्या नवनवीनज संकल्पना कल्पना यांची ओळख होते त्यामुळे ते आपल्या अध्यापन पध्दतीत बदल करून विद्यार्थ्यांना नवीन पध्दतीने अध्यापन करू शकतात.
२. दुरस्थ शिक्षण हे स्वयं अध्यापन पध्दतीवर अवलंबून असल्याने विद्यार्थी शिक्षक हा नेहमी तत्पर असतो.
३. तंत्रज्ञानाचा अधिक उपयोग करण्याचे प्रमाण वाढेल. उदा. इंटरनेट युटयुब इ.
४. व्हिडीओ कॉन्फरन्सव्दारे विद्यार्थी शिक्षक यांच्याशी संपर्क साधने अधिक सोईचे होणार आहे.
५. विविध शैक्षणिक वेबसाईटचा देखील वापर शिक्षक प्रशिक्षणात होईल. त्यामुळे शिक्षक विद्यार्थी हे अपटेड राहतील.

**निष्कर्ष** ः

१. भविष्यातील दूरस्थ शिक्षण प्रशिक्षणात महत्त्वाची भूमिका बजावली.
२. सर्व विषयांचे ज्ञान मिळविण्याचे साधने सहजतेने उपलब्ध होतील.
३. एकाच वेळेस अनेकांना याचा लाभ घेता येईल.
४. आपल्या सवडीनुसार विद्यार्थी वर्क करू शकतील.

५ . तंत्रज्ञान व शिक्षक प्रशिक्षणाचे अतूट नाते तयार होईल .

६ . तंत्रज्ञानामुळे शिक्षक हा अपटेड राहण्यास मदत होईल .

७ . विषयतज्ञ आणि विद्यार्थी यातील कमी होण्यास मदत होईल .

**संदर्भ ः**

*डॉ. न.रा. पारसनीस २००८ शिक्षकांचे प्रशिक्षण नित्यनूतन प्रकाशन पुणे*

*डॉ. गुरूप्रसाद कक्कड २००८ शिक्षण व अध्यापक शिक्षण*

*डॉ. शशी गायकवाड नित्यनूतन प्रकाशन पुणे*

*डॉ. दत्तात्रेय तापकीर २००९ विद्यमान शिक्षणातील नवविचार प्रवाह*

*डॉ. गौतम लोंढे संघमित्रा प्रकाशन मिरज*

*डॉ. निलीमा सप्रे २००१ शिक्षणातील विचारप्रवाह*

*डॉ. प्रीती पाटील फडके प्रकाशन कोल्हापूर*

*डॉ. के.यु. घोरमोडे २००९ शिक्षकांचे शिक्षण*

*डॉ. कला घोरमोडे विद्याप्रकाशन नागपूर*